पुणे विद्यापीठ

सदंर्भ क्र.:एम.आय.सी/१८२ दिनांक :११/०७/२०११

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य, कला, विज्ञान, अभियांत्रीकी महाविद्यालये

महोदय / महोदया,

आपणास ज्ञात आहेच की शैक्षणिक पात्रता विभागाने (Eligibility Section) महाविद्यालयात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांस एक ११ आकडी क्रमांक दिलेला आहे. हे सर्व क्रमांक शैक्षणिक पात्रता विभागाने महाविद्यालयांस कळविलेले आहेत.

एप्रिल २०११ पासून परीक्षा अर्जावर विद्यार्थ्यांचा हा अनुक्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे. यामुळे परीक्षा अर्जावर unipune.ID या रकान्यामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पात्रता विभागाने दिलेला ११ आकडी क्रमांक असल्याशिवाय बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी/ एम.ए/एम.कॉम इ. परीक्षांचे अर्ज आपण स्वीकारु नये अथवा विद्यापीठाकडे असे अर्ज आणून देऊ नये यांची नोंद घ्यावी. **नवीन परीक्षा अर्जच ज्यामध्ये unipune.ID अर्थात eligibility विभागाने दिलेला नंबर भरण्यासाठी रकाना असलेले अर्ज स्वीकारणे गरजेचे असल्यामुळे आपण असेच अर्ज स्वीकारावे** (असे अर्ज unipune.ac.in वर उपलब्ध आहेत) जुने अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊ नये, स्वीकारु नये. शैक्षणिक पात्रता विभागाने शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून unipune.ID नंबर दिलेले आहेत. त्यामुळे त्यापूर्वीचे विद्यार्थी ज्यांना हा क्रमांक दिला गेला नाही त्यांचे अर्ज या क्रमांका शिवाय स्वीकारण्यात यावेत.

आपणास विनंती की आपण विद्यार्थ्यांना त्यांच्या Eligibility क्रमांकाची माहिती देऊन त्यांच्याकडून परीक्षा अर्जावर या क्रमांकाची नोंद करुन घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासु,

परीक्षा नियंत्रक

सोबत: युनिपुने आयडीबाबत माहिती देणारे पत्रक.

परीक्षा अर्जावर नव्याने अंतर्भूत केलेल्या युनिपुने आयडीबाबत

(उपरोक्त आयडी हा शैक्षणिक वर्ष २०१० - २०११ पासून देण्यात आला आहे)



युनिपुने आयडी (एलिजीबीलिटी आयडी) बाबत सूचना:

१. उपरोक्त पीडीएफ फाईलचे प्रिंटआऊट काढून संबंधित महाविद्यालयाने उपरोक्त क्रमांकाची माहिती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त क्रमांकाचा उपयोग परीक्षा अर्जावर नमूद केल्याने भविष्यातील विद्यार्थ्यांच्या विद्यापीठ विषयक कामकाजाकरिता होईल.